## खूप हिय्या करून...

खूप हिय्या करून
पात्रात उतरलोच एकदाचा
नदी खळखळून हसली
वाळूने पायाला गुदगुल्या केल्यात
कमरेला विळखाच घातला पाण्याने
खरं म्हणजे कोण कोणात उतरले होते
हेही एक कोडं होतं
आजमावत राहिले खूप पाणी पाण्याला
जोखत राहिले एकमेकांचे किनारे
सारे सुटत राहिले बंध आदिम
आतल्या बेटांना धडकायला लागल्या लाटा
आणि हजार वाटा फुटत राहिल्या दिशांच्या पलीकडच्या
खूप हिय्या करून निघालो पात्रातून
तर मी होतोच कुठे?
सगळ्या अवयवांना आंतरअवयवांना फुटले होते
अगणित प्रवाह
काळ धावत होता
रक्त बनून
हृदयापासून मेंदूपर्यंत
मेंदूपासून हृदयापर्यंत
विशाल शरीराला पोषित
चिरंतन...

**–प्रमोदकुमार अणेराव**

## पुढे हिरवळ आहे

उरली असेल थोडीशी हिरवळ
म्हणून जिथं पोचलो आपण
तिथल्या पांदीला कणसं तर आलीत
पण पाणकणसात दाणे भरत नाहीत
हे सत्यही लपवण्यासारखं राहिलं नाही

ज्या शब्दांनी मातीचं मन उलगडलं
त्यांनी सोडून दिलंय कधीपासूनच
मातीसाठी झटणं
आणि त्या शब्दांच्या धगीनं
आपण पुन्हा वळलोय मातीकडे

जिथं सहजच हात पोचेल असं वाटतं
तिथल्या एकशेवडी लिंबाच्या लिंबोळ्या
उंचच असतात दिसल्यापेक्षा
आणि ओलसावटीला वैतागूनही
आपण तोडू शकत नाही
समाईकातली झाडी

बोराटीवरच्या रंगीत चिंध्या काढताना
कित्येक वेळा
भयंकर खोल ओरबाडलं आपल्याला
किंवा चिंध्या तरी फाटल्या
आता तर
देखण्या स्थलांतरित पक्ष्यांचे थवेही
जाणारच आहेत ठरावीक काळात
तरी पर्यटनस्थळांच्या आराखड्यात
दाटीनं का होईना
बसावंच लागेल आपल्याला
– पुढे हिरवळ आहे
अशी पाटी लावून

**– कल्पना दुधाळ**